
# वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघात होणार नाहीत : तेजस डोळ




रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत मार्गदर्शन करताना तेजस डोळ सोबत डॉ.बी.एन.रावण, डॉ.विजयकुमार पाटील, शिवाजीराव पाटील, जयंत हाके, डॉ.उषा पवार, डॉ.एस.एस.कुरलीकर, विशाल हिरवे, प्रा.डी.एच.नाईक व मान्यवर

वाहनांची संख्या वाढत आहे त्यामुळे दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढत आहे यामध्ये तरुण वर्ग बळी पडत आहे यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींनी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करावा व वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघात होणार नाहीत असे प्रतिपादन आर.टी.ओ. कार्यालय,कोल्हापूर येथील सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक तेजस डोळ यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत समाज प्रबोधन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना तेजस डोळ बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात आर.टी.ओ.कार्यालय,कोल्हापूर येथील सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक जयंत हाके यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण एक्टिव्हीटी प्रमुख डॉ. एस. एस. कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विशाल हिरवे यांनी केले पाहुण्यांची ओळख डॉ. उमा पाटील यांनी करून दिली आभार  प्रा. एच. एस. शिरसट यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.डी. एच. नाईक यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.